शासनाकडे करावयाच्या पत्र
व्यवहारासंदर्भात

**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्र.टिएफसी-१९१४/प्र.क्र.१३२/नवि-४

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- २२ सप्टेंबर, २०१४

परिपत्रक :-

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाकडे येणारी पत्रे ही जिल्हाधिकारी यांच्या सहीने न येता "जिल्हाधिकारी यांचेकरिता" असे नमूद करुन अन्य व्यक्तीने स्वाक्षरित केलेली असतात. शासनाकडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येणारी पत्रे जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने येणे आवश्यक आहे. तरी यापुढे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनास होणारा पत्रव्यवहार जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीनेच करण्यात यावा अन्यथा त्याची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(राजेश पाध्ये)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

प्रत (माहितीसाठी)
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
निवडनस्ती(नवि-४)